

# हंपी बदामी ऐहोळे

माधुरी नाईक



# हंपी बदामी ऐहोळे

माधुरी अरविंद नाईक

ई साहित्य प्रतिष्ठान

हे पुस्तक विनामूल्य आहे

पण फ़ुकट नाही

हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिटं

१ मिनिट : हे पुस्तक तुम्हाला कसे वाटले ते लेखिकेला कळवा.

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेलकरून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

# हंपी बदामी ऐहोळे

लेखिका : माधुरी अरविंद नाईक

Ph. 9820234891

madhuri.jadhav26@yahoo.in

या पुस्तकातील लेखनाचे व छायाचित्रांचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

ई साहित्य प्रतिष्ठान

esahity@gmail.com

www.esahity.com

Published : 19 November 2017

©esahity Pratishthan® 2017

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.
- या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण किंवा एकांकिका, नाटक. सिनेमा. सिरियल. स्टेज शो किंवा तत्सम रुपांतर किंवा भाषांतर करण्यासाठी लेखिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे.

# कर्नाटक दर्शन

## (बदामी, पट्टदकल, ऐहोळे, महाकुट, हम्पी,अलमट्टी धरण, कुडाळसंगम, दांडेली)

आम्हाला वर्षाअखेर आठ दिवस सुट्टी मिळाली होती.बऱ्याच काळानंतर अशी दोघांना सुट्टी एकदम आणि ती पण आठ दिवस मिळाल्याने आम्ही जामच खुश होतो. मग जवळच कर्नाटकला जाण्याचे ठरले. कर्नाटकला जाण्याअगोदरच सुनिला पाटील यांचा लेख वाचायला मिळाला. त्यांमुळे अजुन कर्नाटकबद्दल माहिती मिळाली. तो पेपर सोबत ठेवुन आम्ही निघालो.

कर्नाटक निसर्गसौ्द्र्यासाठीच नव्हे तर प्राचीन काळापासून इथे राहणार्या वेगवेगळया राज्यांची आणि धर्मांची छटा इथल्या वेगवेगळया शहरांच्या राजवांड्यामधे, मंदिरामधे आणि इतर आर्किओलॉजिकल साईट्समधे दिसते. भारतात उत्तर प्रदेशानंतर नॅशनल प्रोजेक्टेड मॉन्युमेन्टच्या बाबतीत दुसर्या क्रमांकावर कर्नाटक आहे. मग त्यात बेलूर आणि हळेबिडची होयसाळ मंदिरे असतील, डेक्कन साम्राज्याचे गोल घुमट असेल किंवा जगातले सर्वात उंच मोनोलिथ म्हणजे एकाच रॉकमधून कोरलेले श्रवणबेलगोळामधील गोमतेश्वराची बहुबालीची मूर्ती असेल. जैन धर्माची प्रतीक असलेली ही गोमतेश्वराची मूर्ती जेवढी सुंदर दिसते तेवढाच सुंदर नजारा ही मूर्ती पाहण्यासाठी वर चढून गेलो की दिसतो.

कर्नाटक राज्याच्या दक्षिणेकडच्या जिल्ह्यांत कुद्रेमुख, मडिकेरी आणि अबुंगे ही ठिकाणे देखिल मस्त आहेत.  कर्नाटक अभयारण्यासाठी देखिल प्रसिद्ध आहे. इथे २५ छोटी मोठी अभयारण्य आहेत. इथे सर्वांच्या आवडीचे ठिकाणे आहेत.सुंदर बगीचे आहेत. ट्रेक साठी डोंगर दर्या आहेत. वन्यजीवप्रेमींसाठी अभयारण्ये देखिल आहेत. बंदीपूर, बणेरघट्टा, नागरहोळ अशी राष्ट्रीय उद्यानेही प्रसिद्ध आहेत. जोग, कावेरी, गोकाक असे धबधबे आहेत. चिकमंगळुर, कुर्ग, सकले्शपु, याना, अगुंबे, कुद्रेमुख ही हिलस्टेशन देखिल आहेत

कोल्लुर, उडुपी, गोकर्ण, नंजनगुड, श्रीरंगापट्टण्म, कोदाचादरी ही विविध मंदिरे तीर्थशेत्रे देखिल आहेत. चला तर थोडी सफर करुया कर्नाटकची.

## बेळगाव

सर्वात पहिले आम्ही इथुन बेळगावला गेलो. थोडस बेळगावविषयी बोलुया.बेळगाव त्याच्या सीमावादामुळे नेहमीच चर्चेत राहीले आहे. बेळगावला ६ ते ८ फेब्रुवारी २०१५ दरम्यान भारतीय ९५वे मराठी नाट्यसंमेलन झाले. यापुर्वी देखिल १९५६ मध्ये आचार्य अत्रे यांच्या अध्यक्षतेखाली नाट्यसंमेलन झाले होते.संतश्रेष्ठ  ज्ञानेश्वरांची भाषा हे बेळगावचे म्हणजेच वेणुग्रामचे भुषण आहे. बेळगावात तीन अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलने झाली. (१९२९,१९४६,२०००) आम्ही रात्री गाडीत बसलो व सकाळी तिकडे पोहचलो. दुपारपर्यंत आराम करून संध्याकाळी बेळगावचा किल्ला, तलाव बघितला. किल्ला सेंट्रल बस स्टॅन्ड जवळच आहे. तो किल्ला आता आर्मीने ताब्यात घेतला आहे. किल्ला म्हणजे आता फ़क्त मोठी तटबंदी आहे.

किल्ल्याला प्रवेश करताच डाव्या बाजूला मिलेट्री दुर्गा देवी मंदीर आहे. प्रवेशद्वारातून गाड्यांची सतत ये-जा चालु असते. पोस्ट आफीस, गेस्ट हाऊस, दवाखाना किल्ल्यातच आहे. पुढे रामकृष्ण मिशनने बांधलेले चे अतिशय सुंदर मंदीर आहे. स्वामीजींने निवास केलेले घर आजही व्यवस्थित राखले आहे. त्यामधे स्वामीजींची बसलेली मुर्ती आहे. समोर लोक ध्यानधारना करण्यासाठी बसलेले होते. तिथे स्वामीजींचे नऊ दिवस वास्तव्य होते. रामकृष्ण मिशनने असे ठरवले आहे कि स्वामीजी जिथे जिथे गेले त्या वस्तु, वास्तु हेरिटेज म्हणुन संरक्षित करायचे. त्यासाठी बेळगाव मधे सन्मान हॉटेलच्या बाजुला स्वामीजी चार दिवस राहिले होते, ती वास्तु जतन करुन ठेवण्यात आली आहे. तिथे एका रूम मधे स्वामी चार दिवस होते. त्यांनी वापरलेले टेबल, खुर्ची जतन करुन ठेवले आहे. मुख्यमंदिराच्या बाजुला गार्डन, मोठा सभामंडप,

कायमस्वरुपी त्यांच्या पुस्तकांचे, सी.डी. ची बुक गॅलरी आहे. बाजुला त्यांच्या जीवनावर आधारीत माहितीपटाचे प्रदर्शन आहे. पुढे २०० मीटरवर कमलबस्ती म्हणुन ठिकाण आहे. तिथेही संरक्षित क्षेत्र म्हणुन घोषित केले आहे. मंदिरामधे गाभार्यात छतावरती उलटे कमळ आहे. म्हणुन त्याला कमलबस्ती म्हणतात असे तेथील लोकांनी सांगितले.हे मंदीर ८०० वर्षे जुने आहे असे सांगण्यात आले. आतमध्ये शंकाराची पिंड आहे.







बाजुला आतमध्ये काहीही मुर्ती नसलेली एक वास्तु होती. ती मुर्ती उध्वस्त केलेली आहे. त्यामुळे दरवाजा लावुन ती वास्तु बंद करुन ठेवली आहे.



किल्ल्याजवळच किल्ला तलाव आहे. तलावामधे बोटींगची सोय केलेली आहे. फेरी बोट, स्पीडबोट, आहेत.

बाजुला लोंकाना चालण्यासाठी पुर्ण तलावाला फुटपाथ केलेला आहे. समोरच्या बाजुला मुलांना खेळण्यासाठी मोठे गार्डन केलेले आहे. तलावाचा घेर फार मोठा आहे. आणि शहरात अगदी मध्यवर्ती असल्याने लोंकाची फारच रहदारी असते.





## हलशी :-

बेळगावपासुन ४० कि.मी. वर हलशी हे छोटे गाव आहे. हलशी हे गाव ऐतिहासिक मंदिरे, स्मारकांसाठी व निसर्गसौद्र्या साठी प्रसिद्ध आहे. येथिल भुवराह नरसिंह मंदिर कदंबकालीन स्थापत्यकलेचा उत्कृष्ट नमुना समजला जातो. याठिकाणी एक किल्लाही असुन, गोकर्णेश्वर, कपिलेश्वर, हतकेश्वराची मंदिरे आहेत. पुरातत्व खात्याकडुन ही सर्व मंदिरे व स्मारकांची देखभाल केली जाते. इतिहासकारांच्या मते पाचव्या शतकात कदंबकाळात या मंदिराची उभारणी झाली. असे म्हणतात की पांडवांनी एका रात्रीत हे मंदिर बांधुन भगवान विष्णुची आरधाना केल्याचे बोलले जाते.

## भीमगड अभयारण्य :-

बेळगावपासुन ४६ कि.मी. वर भीमगड हे अभयारण्य आहे. बेळगाव जिल्ह्यातील पहिले वन्यजीव अभयारण्य म्हणुन भीमगडची ओळख आहे. केवळ भारतातच आढळणार्या ‘ राउटन्स फ्री टेल्ड ‘ या वटवाघळांचे आश्रयस्थान याच अभयारण्यात आहे. तसेच इतर अने प्राणी, पशु,पक्षी देखिल आहेत. भीमगड या किल्ल्यावरुन या अभयारण्याला हे नाव देण्यात आले. गोव्याची जीवनदायिनी असलेली म्हादई नदी याच अभयारण्यात उगम पावते, चापोलीजवळ म्हादई नदी उंचावरुन खाली कोसळते. त्यामुळे वज्रपोहा हा सुंदर धबधबा तयार झाला आहे. अभयारण्यामधे हेम्मड्ग्यानजीक नेचर कॅम्प  देखिल आहे. इथे रहाण्याची, जेवण्याची सोय देखिल आहे. एक दिवस रहाण्यासाठी हे मस्त ठिकाण आहे.

बेळगावचा प्रसिद्ध पदार्थ म्हणजे कुंदा. साधारण शंभर एक वर्षापुर्वीचा. ह्या कुंद्याने सर्वानाच वेड लावले आहे. बेळगावमधुन कुंदा घेतल्याशिवाय कुणीही बाहेर पडत नाही. कुंदा हा दुधाचा पदार्थ आहे. दुध खव्याएवढा आटवुन त्यात साखर घालुन कुंदा तयार केला जातो. पण तो खास बनतो तो बेळगावच्या दुधाचाच. बेळगावची हवा कुंद्याला अनकुल आहे. तसेच कुंदा, ड्रायफुटसाठी राजपुरोहित स्वीटस प्रसिद्ध आहे.तिकडचे तांदळच्या पिठाचे वडापे, खोबर्याची पोळी, तांदळाचे शेवगे देखिल प्रसिद्ध आहे. बेळगाव तळकोकणला लागुन असल्याने कोकणातील घावने, वडे आणि कोकणी पदार्थ देखिल इथे दिसतात.

तसेच बेळगावचा अजुन एक मस्त पदार्थ आहे तो म्हणजे आलेपाक. बेळगाव सोडले तर महाराष्ट्र व कर्नाटक सोडले तर कोठेही आलेपाक मिळत नाही. इतरत्र त्याच्या वड्या मिळतात. साध्या भडंगासारखा हा आलेपाक दिसतो. पण एकदा खाल्ला की तासभर त्याची चव जिभेवर राहते. आलेपाक आणि उसाचा ताजा रस एकदम भन्नाट कॉम्बिनेशन आहे. शेंगा आलेपाक आणि पोहे आलेपाक हे आलेपाकाचे दोन प्रकार आहेत. दुसरा एक पदार्थ म्हणजे मांडे. कर्नाटकातील वैष्णव ब्राह्मणवर्गात लग्नात मांडे लागतात. लग्नसोहळयात पुजा म्हणुन वापरला जाणारा पदार्थ आता सगळीकडे उपलब्ध होत आहे. चवीला गोड असणारा हा पदार्थ साधारण एक पंधरा दिवस टिकतो. हे मांडे चवीला मधुर असल्याने त्याची दिवसेंदिवस मागणी वाढ्त चालली आहे.

नंतर बोगारवेसला शनी मंदीरात जाऊन दर्शन घेतले. पुढचा प्रवास भावासोबत करणार होतो. तो कसा करायचा हे सगळयांचे वेगवेगळे मत घेउन ठरवले. पहिले बदामीला जायचे हे ठरले.

## बनशंकरी

दुसर्या दिवशी आम्ही दुपारी बदामीला निघालो. बदामीला पोहचलो तेव्हा संध्याकाळ झाली होती. तिथे काही होटेल फुल झाले होते काही मधे खुपच भाव सांगत होते. तिथे चौकशी केल्यावर लोकांनी सांगितले की इथे ५ कि.मी. वर बनशंकरी देवीचे प्राचीन मंदीर आहे आणि तिथे भक्तांना रहाण्याची पण चांगली सोय आहे. मग आम्ही तिकडे गेलो.तिथे कन्नड, मराठी, हिंदी असा सावळा गोंधळ घालुन रूम मिळवला. फ्रेश होऊन बाहेर पडलो. थोडी थंडी जाणवत होती. मंदीर परिसर अतिशय शांत, सुंदर आहे. मंदीरासमोरच फार मोठा तलाव आहे. तिकडे बर्याच ठीकाणी विभुती विकायला ठेवलेली होती. बनशंकरीला वनदेवता किंवा वनस्पतिदेवता असेही म्हणतात. जंगलामध्ये निवास केल्यामुळे हिला वनदेवता असेही म्हणतात.आम्ही गेलो तेव्हा तिथे थोड्याच दिवसातच यात्र सुरु होणार होती. यात्रेची तयारी पण सुरु होती. यात्रा २ महिने चालते असे सांगितले. लांबुन लांबुन लोक येतात तिथेच राहतात, जेवण बनवतात. देवीला अजुनही यात्रेच्या वेळेला तरकारी पोशाख चढवतात आणि त्यानेच मुर्ती सजवितात भक्त १०८ तरकार्याची भाजी बनवुन देवीला अर्पण करतात. हे एक पवित्र कर्तव्य इथले लोक समजतात.

ही देवी अजुनही शांकाबरी नावाने प्रसिद्ध आहे. चालुक्य राजवंशाची ही बनशंकरी देवी. बरेच जणांची ही कुलदेवता देखील आहे.

देवीचे भक्त हे महाराष्ट येथुन येतात. मंदिराच्या चारही बाजुला उंच भिंत आहे. गर्भग्रुहात सिंहावर बसलेली आठ हातांची मुर्ती अतिशय सुंदर आहे हिला दुर्गादेवी असे पण म्हणतात.








# बदामी


बदामी हे कर्नाटक राज्याच्या बागल कोट जिल्ह्यातील जुने शहर आहे. बदामी गुहा देवालय ह्या उंचावर लाल दगडात कोरलेल्या आहेत. सहाव्या ते आठव्या शतकात चालुक्याची राजधानी होती. चालुक्य



शासनाच्या काळात अनेक राजांनी सर्वधर्म समभाव ही भावना जोपसल्यामुळे जैन, बुद्ध, शैव,वैष्णव ह्या सर्वांना आश्रय मिळाला होता. त्यामुळेच बदामी हे सर्व संस्कृति आणि कलेचे संगम क्षेत्र बनले होते.

अगतस्य तलावाच्या काठी बदामी वसलेले आहे.


बदामीच्या गुंफा ह्या सगळया लाल कलरच्या दगडामध्ये आहेत. त्यावेळी एवढ्या मोठ्या दगडांना कापुन बनवने ही सामान्य गोष्ट नाही. वापरलेले तंत्रज्ञान ही त्याचीच साक्ष आहे. चला तर फिरुया संपुर्ण बदामी.

**शैव गुहालय:-**


ही प्राचीन शैव गुहालय तीन भागात बनलेली आहे. गर्भगृह, सभामंडप, मुखमंडप . मुखमंडपामध्येच देवतांची शिल्पकृती आहे. पण आतमध्ये प्रकाशाची व्यवस्था व्यवस्थित केलेली नाही. बाहेर हरिहर, अर्धनारेश्वर, नटराज, महिषासुरमर्दिनी आदि देवतांची शिल्पमुर्ती आहेत.


आम्ही गेलो तेव्हा अनेक शाळांच्या सहली आल्या होत्या. शाळकरी मुले अतिशय आनंदाने सर्व पहात होती. त्यांना पाहुन आम्हाला आपल्या शाळेतील सहल आठवली. सहल म्हटले की किती आनंद होत असे. सहल जाणार त्या दिवशी रात्री झोप पण येत नसे. कधी एकदा सकाळ होईल असे होत असे.




पाठीमागे दिसणारे सफेद बदामी शहर. एकडे सर्वच घरांना सफेद चुना बाहेरुन लावतात.

















# पट्टदकल





पट्टदकल हे भारतातील कर्नाटक राज्याच्या बागलकोट जिल्ह्यात असलेले एक खेडे आहे. या ठिकाणास युनेस्कोने जागतिक वारसा स्थळाचा दर्जा दिलेला आहे. हे खेडे बदामीपासून २२ किलोमीटर व ऐहोळेपासून १० किलोमीटर अंतरावर आहे. येथील ऐतिहासिक मंदिरांसाठी हे ठिकाण प्रसिद्ध आहे. दरवर्षी जानेवारी- फेब्रुवारीत चालुक्य महोत्सव नावाचा वार्षिक नृत्य महोत्सव होतो. या महोत्सवाला खूप पर्यटक येतात.

पट्टदकल ही चालुक्य राजघराण्याची राजधानी होती.

कन्नड साहित्यातील सिंगिराज पुराणातील उल्लेखानुसार तत्कालीन पुराणकालीन निग्रा, नहुष, नल, पुरुष, वसु, सागर, नंद आणि मौर्यकालीन राजे इत्यादींनी त्यांचा ‘पट्टबंध’ महोत्सव म्हणजे राज्याभिषेक करण्यासाठी या ठिकाणाची निवड केली होती. मानवी उत्क्रांतीचा प्रारंभ येथे खूप पूर्वी झाला असावा असे मानले जाते. येथील पापनाथ मंदिरापासून सुमारे २०० मीटर अंतरावरील मलप्रभा नदीच्या पात्राजवळ शेकडो दगडी हत्यारे सापडली आहेत;


त्यांचा वापर येथील मंदिराच्या शिल्पकलेसाठी झाला असावा असा एक अंदाज व्यक्त केला गेला आहे. ‘ए गाइड टू जॉग्रफी’ या दुसऱ्या शतकाच्या मध्यावरील काळाच्या संशोधन पुस्तकात या शहराचा रोमन साम्राज्याशी व्यापार होता असा उल्लेख आहे. म्हणजे त्या काळात हे व्यापारीदृष्टय़ा प्रगत शहर असावे.
























# ऐहोळे

ऐहोळे कर्नाटक राज्याच्या बागलकोट जिल्ह्यात येते. बदामीपासुन ४० किमीवर ऐहोळे शहर वसलेले आहे. मलप्रभा नदीच्या किनार्यावर असलेले हे छोटेसे गाव आहे. गावात १००च्या जास्त मंदिरे आहेत. पण ह्या मंदिराची पुजा केली जात नाही. गावात त्या पुरातन वास्तुमधेच म्हणजे जुन्या गावातच लोकांनी आपली आता घरे बांधली आहेत. गावात प्रवेश करताच हे दिसते. तसे केले नसते तर ते गाव अजुन सुंदर दिसले असते.

तो संपुर्ण प्रदेश तसाच संरक्षित करायला हवा होता. तरी पण बराच भाग सरकारने संरक्षित केला आहे.

**ऐहोळेच मुख्य मंदिर म्हणजे दुर्ग देवालय ( किल्ला )( इ. स. ७४२ )**

हे सातव्या शतकातील अत्यंत सुंदर देवालय मानले जाते. हे दुर्ग देवालय देवीचे नाही. किल्याला हिंदीत दुर्ग म्हणतात म्हणुन त्याचे नाव तसे आहे .ह्या देवळाच्या आतील आणि बाहेरील शिल्पकलाकृती कला सौद्र्याने परिपुर्ण आहे. ह्या मंदिराच्या भोवती चारही बाजुला प्रदक्षिणा मारण्याची सोय आहे. वरती छोटेसे शिखर देखिल दिसते. सभाभवन मध्ये सगळीकडे प्रकाश येण्यासाठी खिडक्या बनवल्या आहेत.

**ऐहोळेतील मुख्य मंदिरे :-**

कुटीर देवालय आठवे शतक

नायिदर देवालय

लाड्खा्न देवालय (इ.स.५००)

सुर्यनारायन देवालय

गौडर देवालय

सुतार देवालय

चक्र देवालय

अम्बिगा देवालय समुह

चिक्की देवालय समुह

हुच्च मल्ली देवालय समुह

रावनफडी गुफा

ज्योतिलिंग देवालय समुह

विरुपाक्ष  देवालय

मल्लिकार्जुन देवालय समुह

बौद्ध चैत्यालय

मोगती देवालय

चरंतिमठ


हुच्चप्पय्यन मठ

जैन देवालय समुह

राचि देवालय

श्री रामलिंगेश्वर देवालय समुह


गळगनाथ देवालय समुह






















ही सर्व शहरे बघण्यासाठी, अनुभवण्यासाठी निवांत वेळ हवा. ऐहोळे व पट्टदकलच्या अगदी जवळ ईलकल नावाचं विणकरांच खेडं गाव आहे ..इथल्या ईलकल साड्या खुप प्रसिध्द आहेत... आपण त्यांना चुकीने ईरकल म्हणतो.

# महाकुट

ऐहोळे  ते महाकुट अंतर २५ किमी. आहे. येथे गरम पाण्याचे कुंड आहे. महाकुट मंदीर समुह कर्नाटकमधील बागलकोट जिल्ह्यात येते. महाकुट मंदीर समुहातील एका मंदीरासमोर अजुनही योग्य अवस्थेत असलेला नंदी आहे. महाकुट येथील काही मंदीरांमध्ये अजूनही पुजा केली जाते आणि हा नंदी देखील त्याला अपवाद नाही .असे म्हटले जाते की सहाव्या सातव्या शतकांमध्ये महाकुट येथे चालुक्य वंशजातील सत्ताधिशांनी अप्रतीम संरचना उभारल्या आणि एकदा भेट दिल्यावर आपणासही त्याचा प्रत्यक्ष अनुभव येतो..हा सर्व प्रवास एका दिवसात करुन आम्ही हम्पीला मुक्कामी गेलो.




# हम्पी

हम्पी साधारण महाकुट ऐहोळे पासुन १५० किमी.वर आहे. आम्ही हम्पीला पोहचलो तेव्हा संध्याकाळ झाली होती. हम्पीच्या प्रवेशद्वाराजवळच घाणीचे साम्राज्य बघुन आम्ही थोडे नाराज झालो होतो. पण दुसर्या दिवशी सुंदर नजारा बघुन सुखावलो. हम्पीमध्ये तुम्ही कितीही वाजता रुम घेतली तरी सकाळी नऊ ला तुम्हाला रुम सोडावी लागते. काळाच्या ओघाने हम्पीला ‘ फॉरगॉटन एम्पायर’ हा खिताब जरी दिला असला तरी इथे प्रत्यक्षात भेट दिल्यावर परत यावेसे नक्कीच वाटते. आप्ल्याला प्राचीन आर्किटेक्चरमधे फार रुची नसली तरी हम्पीचा लॅडस्केप हा सर्वांनाच आवडेल. इथे अनेक रॉक्स आणि बोल्डर्सच्या रांगा आहेत. निर्सगाने जणु लगोरी खेळण्याची हौस पुर्ण करावी असे मोठे मोठे दगड आणि बोल्डर्स एकमेकांवर एक वेगवेगळया आकारांमध्ये मांडलेले दिसतात. हंपी हे भारताच्या कर्नाटक राज्यातील बेल्लारी जिल्ह्यातले एक गाव आहे. हे गाव तुंगभद्रा नदीकाठी वसले आहे. हे गाव प्राचीन हिंदू विजयनगर साम्राज्याचे राजधानीचे नगर होते. हंपी येथील श्री विरुपाक्ष मंदिर हे प्रसिद्ध आहे. युनेस्कोद्वारे हंपी या गावाला जागतिक वारसा स्थळ म्हणून घोषित केले आहे. येथे विरुपाक्ष मन्दिर, रघुनाथ मन्दिर, नरसिंह मंन्दिर, सुग्रीव गुफ़ा, विठ्ठलस्वामी मन्दिर, कृष्ण मन्दिर, प्रसन्ना विरूपक्ष, हज़ार राम मन्दिर, कमल महल आणि महानवमी डब्बा अशी प्रमुख मंदिरे आहेत.

## श्री विरुपाक्ष मंदिर

विरुपाक्ष हे शंकराचेच एक रुप आहे.हे मंदिर विरुपाक्ष आणि त्यांची पत्नी पंपादेवीला समर्पित आहे. दरवर्षी डिसेंबर महिन्यात येथे हम्पी महोत्सव आयोजित केला जातो. मंदिराचे बांधकाम दोन काळात केले गेले आहे. मंदिराचा संपुर्ण इतिहास हा प्रसिद्ध विजयनगरच्या साम्राज्याशी निगडित आहे.






GANGA HANDICRAFT'S







## लक्ष्मी- नरसिंह मंदिर, बडवीलिंग






हे हम्पीमधिल सगळयात मोठे शिवलिंग आहे. ह्या शिवलिंगाची निर्मिती एका स्थानिक शेतकरी महिलाद्वारे केली आहे असे बोलले जाते.ठिकठिकाणी असे माहितीचे फलक लावलेले आहेत. हे लिंग लक्ष्मी- नरसिंहच्या मुर्तीजवळच आहे.

## लोटस महल, राणीचे अंघोळीचे कुंड










**हाथीशाळा, जनाना प्रांगण**

हाथीशाळा मध्ये अकरा मोठे रुम आहेत.

प्रत्येकावर वेगवेगळे घुमट आहेत. त्यामध्ये राज्याचे हत्ती रहात असत.










## बडा गणेश मंदिर





## संगीतमय स्तंभाचे विठ्ठल मंदिर


येथे जाण्यासाठी बॅटरी कारने जावे लागते. बाहेरच्या वहानांना येथे प्रवेश नाही.











# कुडाळसंगम

हम्पी नंतर आम्ही कुडाळसंगमला आलो. कुडाळसंगम अलमट्टी धरणापासुन १५ किमी.वर आहे. अलमट्टी धरण हे उत्तर कर्नाटकात कृष्णा नदीवर बांधलेले विशाल धरण आहे. धरणाची भिंत विजापूर जिल्ह्यात असून पाण्याचा साठा बागलकोट जिल्ह्यात पसरला आहे. धरणाचे बांधकाम इ.स. २००५ साली पूर्ण झाले. या धरणावर लालबहादूर शास्त्री सागर अशा नावाचा जगातील सर्वात लांब धातूचा फलक तयार करून बसवला आहे. ही अक्षरे महाराष्ट्रातील लोणावळा येथील ऋषिकेश राऊत या डिझाइनरने बनवलेली आहेत.





महात्मा बसवेश्वर (जन्म : ३० मार्च, इ.स. ११३४ - मृत्यू : इ.स. ११६७) हे कर्नाटकातील संत व समाजसुधारक होते. लिंगायत पंथाचे हे महत्त्वाचे स्थान आहे. लिंगायत किंवा वीरशैव हा हिंदू धर्मातील १२व्या शतकात बसवेश्वर यांनी स्थापित केलेला एक शैव पंथ आहे. या पंथातील काही तत्त्वे मूळ हिंदू धर्माच्या तत्त्वांपेक्षा वेगळी आहेत. या पंथाचे लोक शिव हा एकाच देव मानतात, आणि लिंगस्वरूपात त्याची पूजा करतात. वेद मानीत नाहीत. त्यांच्यांत कर्म आणि पुनर्जन्म या कल्पना नाहीत. महात्मा बसवेश्वर ह्यांबद्दल पुर्वी केव्हा ऐकले नव्हते

त्यामुळे त्यांच्याबद्दल माहिती घेण्यात एक वेगळी उत्सुकता होती.महात्मा बसवेश्वर ह्यांचे त्या परिसरात बरेच सामाजिक योगदान आहे. बसवण्णांनी कुडलसंगम येथे वास्तव्य केले. बसवण्णांनी समाजातील वाईट चालीरीतींना शह देण्याचा सम्यक विचार केला आणि येथूनच त्यांच्या सामाजिक आंदोलनास सुरुवात झाली. पुढे कामाच्या शोधार्थ बसवण्णा सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा येथे आले. मंगळवेढा येथे बसवण्णांनी सामाजिक चळवळ आरंभ केली. ही चळवळ धार्मिक कर्म कांडाविरुद्ध आणि वर्णव्यवस्थेविरुद्ध होती. त्यांच्या परिवर्तनवादी विचारसरणीने बसवण्णा समाजात लोकप्रिय झाले. वैदिक धर्म नाकारून बसवण्णांनी लिंगायत पंथ स्थापन केला.

कुडाळसंगम हे मलप्रभा व कृष्णा नदीच्या संगमावर बसलेले विजापुर जिल्ह्यातील छोटेसे गाव आहे. तिथुन पुढे त्या वहात श्रीशेल्यम ला जातात. मेन मंदिरात जाण्यासाठी आपल्याला तीन मजले खाली उतरावे लागते.

तेथे आम्ही बसवेश्वर होस्टेल वर रुम घेतली. आम्ही गेलो तेव्हा तिकडे यात्रा लागली होती. तिकडे बराच मोठा सभामंडप आहे. आजुबाजुचा परिसर स्वच्छः आहे. भव्य रांगोळी काढलेली होती.












मंदिराच्या परिसरात आर्ट ग~लरी आहे.









# दांडेली

कुडाळसंगमला एक दिवस राहुन आम्ही आता दांडेली ला चाललो होतो. दांडेली अभयारण्याबद्दल फार वाचले होते ऐकले होते. अभयारण्याबद्दल खुप उत्सुकता होती. दांडेली बेळगाव पासुन ३ तासच्या अंतरावर आहे. हे शहर वेस्ट कोस्ट पेपर मिल कंपनीसाठी प्रसिद्ध आहे. आता भाऊच तिकडे रहात असल्यामुळे जाण्याचा योग जुळुन आला. दांडेलीपासुन २५ कि.मी. वर असलेले सिंथेरी रॉक्स हे ठिकाण अप्रतिम आहे. इथे सर्वत्र दगड पसरलेले आहेत. त्यामध्ये बाराही महिने वाहणारे पाणी आहे. परिसर अतिशय शांत,सुंदर आहे. खाली जाण्यासाठी पायर्या केलेल्या आहेत. मधमाशांचे पोळी इथे खुप लटकलेली दिसतात.

**सिंथेरी रॉक्स**












मग जवळच असलेल्या कुळगी नेचर कॅम्पवर जाऊन यायचे ठरले. सर्व जण मोटरसाय़कल घेउन निघालो. कुळगी दांडेली शहरापासुन १२ कि.मी. वर आहे. जाताना वाटेत सागाचे जंगल आहे. कॅम्प देखिल सागाच्या वनाने वेढलेला आहे. आम्ही आलो तेव्हा दुपार झाली होती.तिथे पोहचलो तेव्हा कॅम्प मस्तच वाटला. सोबत छोटी बच्चे कंपनी पण होती. त्यामुळे आम्ही फक्त माहिती घेतली व पुढ्च्या वेळी सफारी करण्याचे फिक्स केले. 'दांडेली-अंशी टायगर रीझर्व्ह ' हे जंगल जवळ- जवळ १४०० चौरस कि.मी. परिसरात पसरलेले आहे. दांडेली आणि अंशी या दोन भागांत विभागलेले आहे. जंगल अत्यंत घनदाट आहे. पानगळीच असले तरीही

सदाहरित आणि निमसदाहरित आहे. बांबु आणि सागची झाडे जास्त आहेत. जंगलात अनेक प्रकाराचे व्रुक्श आहेत. कुळगी कम्पच्या बाजुला ब्लॅक लेपर्डचा वावर असतो असे तेथील लोकांनी सांगितले. जंगलात वाघ आणि बिबट्याच्या जोडीला जंगली कुत्रे, आणि अस्वल देखिल आहेत. सांबर, बार्किंग डिअर, गवा हे व इतर देखिल प्राणि इथे पहायला मिळतात.शेकरु इथे खुप आहेत.इथले खास म्हणजे इथे काळा बिबटा बघायला मिळतो. हार्नबिल तर खुपच आहेत. साहसी खेळांसाठी दांडेली प्रसिद्ध आहे. व्हाइट वॉटर राफ्टिंगसाठी दक्षिण भारतातील एकमेव केंद्र आहे. हार्नबिल रिसॉर्ट, दांडेली किंगफिशर जंगल स्टे, सेंच्युरी रिसॉर्ट, काळी अडव्हेंचर कॅम्प, बायसन रिव्हर  रिसॉर्ट, यासारखी रिसॉर्टस या ठिकाणी आहेत.सुपा जलविद्युत धरणाचे बॅकवॉटर देखिल पहाण्यासाठी मस्त आहे. इकडे अतिशय सुंदर नजारा आहे.





## कावळा केव्ह

कावळा केव्ह येथे महाशिवरात्रीला सर्वांना फ़्री प्रवेश असतो. बाकी वेळेस ४७५ रुपये भरुन प्रवेश करावा लागतो.

## मगर पार्क

दांडेलीमध्ये अलीकडेच मगर पार्क विकसित करण्यात आले आहे. शहरापासुन ३ किमी.वर  दांडेली अप्पाच्या  जवळच  हे पार्क आहे. सकाळी ९ ते ५ प्रवेश दिला जातो. प्रवेश फी ५० रुपये आहे. काली नदीच्या पाण्यात हे पार्क विकसीत करण्यात आले आहे. दांडेली वनाअभरण्यात हे ठिकाण येते.









टायगर रिझर्वच प्रवे्शद्वार आणि नेचर कॅम्प मधिल अंतर तीन-साडे तीन कि.मी. आहे. घनदाट जंगलातुन हा रस्ता जातो. पुढे गेले कि पळसोली हे गाव आहे. त्याच्या अगोदर तिथे सफारीसाठी असलेला हत्ती बघितला तिथे बसुन आम्ही घरुन आणलेला डबा खाल्ला. गावात देखिल सरकारमान्यतेने सफारीचे बुकिंग होते. तिथे आता अनेक जंगल स्टे सेवा देणारे प्रायव्हेट देखिल लोक आहेत.

आता २-३ दिवस दांडेली चा पाहुणचार घेवुन परतीचा प्रवास करायचा आहे ह्या विचारानेच नको वाटत होते.

# ई साहित्य प्रतिष्ठान

मराठी सिनेमा हा एकेकाळी भारतात हिंदी सिनेमाच्या तोडीस तोड किंवा काकणभर वरचढच होता. पण मध्यंतरी मराठी सिनेमाला उतरती कळा लागली. प्रेक्षक येईना. म्हणून थिएटर मिळेना. थिएटरच मिळत नाही म्हणून चांगले मराठी सिनेमा बनेनात. आणि चांगले सिनेमा नाहीत म्हणून प्रेक्षक मिळेनात. असे एक दुष्टचक्र सुरू झाले. मग आला झी मराठी सिनेमा. आणि त्याच्याच जोडीने छोट्या आकाराची मल्टीप्लेक्स आणि डिजिटल प्रक्षेपण. त्यामुळे पुन्हा एकदा मराठी सिनेमा जोमाने बहरू लागला.

काहीशी अशीच परिस्थिती मराठी साहित्याचीही होत आहे. एकेकाळी टॉपला असलेले मराठी साहित्य मधल्या काळात टिव्ही आणि सिनेमाच्या युगात मागे पडले. पण आता मोबाईल आणि इंटरनेट यांच्यामुळे मराठी वाचकवर्ग फ़ार मोठ्या प्रमाणावर वाढतो आहे. आणि त्याच जोमाने त्यांच्यासाठी लिहिणारा दर्जेदार लेखक वर्गही निर्माण होऊ लागला आहे. मराठी साहित्याच्या भविष्याबद्दल आम्ही अत्यंत आशावादी आहोत.

आपली साथ मात्र पाहिजे. आपल्या ओळखीच्या जास्तीत जास्त लोकांना ई साहित्य बद्दल सांगा. त्यांचे ई मेल पत्ते व whatsapp नंबर कळवा. त्यांना ई साहित्यचं मोबाईल app download करायला सुचवा. आग्रह करा. ई साहित्यचे मार्केटिंग करा. एकदम फ़्रंट फ़ुटवर येऊन खेळू. जबरदस्त मार्केटिंग करू. लाखांचे कोटी करू आणि मराठी साहित्य पुन्हा नंबर वन ला आणू.

ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahitya.com

esahity@gmail.com

आता ई साहित्य चे APP उपलब्ध आहे. ई साहित्यचं App आपण खालील लिंकवरून आपल्या मोबाईलवर डाऊनलोड करा आणि भरमसाट पुस्तकं फ्री वाचा.

https://play.google.com/store/apps/details?id=com.esahity.www.esahitybooks

ई साहित्य प्रतिष्ठानची ई बुक्स Whatsapp broadcast service सुरू झाली आहे. पूर्णपणे फ़ुक्कट पुस्तकं आता आपल्या मोबाईलवर थेट. कृपया नांव नोंदणीसाठी 7710980841 हा नंबर आपल्या मोबाईलवर सेव्ह करा आणि नंतर या नंबरवर वॉट्सएॅप करून आपले नांव व शहराचे नांव कळवा. आपल्याला नियमितपणे एक नवीन मराठी ई पुस्तक Whats app द्वारे पाठवले जाईल. आपण ते पुस्तक आपल्या मित्रांना Whatsapp करा आणि भाव खा.

आपल्या ओळखीच्या किमान दहा लोकांचे मेल आय डी आम्हाला कळवा. त्यांना आम्ही विनामूल्य पुस्तके पाठवू. व आपल्याला VIP सभासद बनवले जाईल.